## उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी पुरस्कार

## नियमावली

दयानंद शिक्षण संस्था संचलित महाविद्यालयांतील प्रशासकीय यंत्रणा प्रभावीपणे कार्यप्रवण करण्यात प्रशासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते, म्हणूनच प्रशासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामाचा गुणगौरव व्हावा, या हेतूने संस्थेच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त **'उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी'** पुरस्कार देण्यात येतील.

**पुरस्काराचे स्वरूप :**

- दरवर्षी संचलित महाविद्यालयांमधून ०२ पुरस्कार वितरीत केले जातील.

| संचलित महाविद्यालयांतील प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी | पुरस्कार संख्या |
|---|---|
| प्रबंधक/ अधीक्षक/ मुख्य लिपिक/ कनिष्ठ लघुलेखक/ वरिष्ठ लिपिक/ प्रयोगशाळा सहायक/ ग्रंथालय लिपिक/ कनिष्ठ लिपिक | ०१ |
| प्रयोगशाळा/ ग्रंथालय परिचर/ सेवक | ०१ |
| **एकूण** | **०२** |

- पुरस्कारासाठी रोख रक्कम रू. १०,०००/- (रूपये दहा हजार फक्त), प्रमाणपत्र व संस्था स्मृतिचिन्ह देण्यात येईल.
- उपरोक्त पुरस्कार विभागून देण्यात येणार नाहीत.

**पुरस्कारासाठी पात्रता :**

१. सदरील पुरस्कारासाठी **महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील प्रशासकीय** अधिकारी/ कर्मचारी यांचाच विचार करण्यात येईल.

२. या पुरस्कारासाठी महाविद्यालयीन प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांची **किमान पाच वर्षे नियमित सेवा** असावी.

Scanned with CamScan

**पुरस्कारासाठी पात्रतेचे निकष :**

१. या पुरस्कारासाठी ०१ एप्रिल ते ३१ मार्च हा कालावधी गृहित धरला जाईल.

२. पुरस्कारासाठी आलेल्या अर्जांची छाननी तसेच पुरस्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड करणेसाठी संस्थेमार्फत एका समितीचे गठण करण्यात येईल.

३. उक्त समितीचे निष्कर्ष पारदर्शक रहावेत, यासाठी अर्जातील माहितीच्या आधारे प्राप्त गुणानुसार निवड करण्यात येईल.

४. हा पुरस्कार अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाकाळात त्यांना केवळ एकदाच देण्यात येईल.

५. ज्या अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या सेवाकाळामध्ये परीक्षा किंवा कर्तव्यात कसूर केल्याबद्दल विहित प्रक्रिया द्वारे शिक्षा (निलंबन, गैरवर्तन, वेतन वाढ रोखणे, इत्यादी) झालेली आहे, असे कर्मचारी पात्र असणार नाहीत.

६. या पुरस्कारासाठी अधिकारी/ कर्मचारी यांचे मागील सलग ०५ वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील. त्यापैकी किमान ०४ गोपनीय अहवाल अतिउत्कृष्ट किंवा उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.

७. पुरस्कार प्रदान करण्यासाठी वर्ग-४ कर्मचारी यांचेसाठी किमान गुणांची आवश्यकता असणार नाही, तथापि त्यांचे मागील ०५ वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील. तसेच सध्या कार्यरत महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे मत विचारात घेण्यात येईल.

८. या पुरस्कारासाठी अधिकारी/ कर्मचारी यांनी मागील सलग ०५ वर्षांमध्ये उपभोगलेल्या रजा विचारात घेण्यात येतील.

९. उक्त पुरस्कारासाठी बिनपगारी रजा घेणारे/ होणारे कर्मचारी अपात्र समजण्यात येतील.

१०. अर्जातील माहितीच्या आधारे समान गुण प्राप्त झाल्यास त्यांचे मागील १० वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील.

११. अंतिम निर्णयाचे अधिकार संस्था प्रशासन राखून ठेवत आहे.

**अर्ज करण्याची पद्धत :**

- उत्कृष्ट पुरस्कारासाठी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.
- या पुरस्कारासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना स्वत: अथवा वरिष्ठांच्या शिफारशीसह अर्ज करता येतील.
- महाविद्यालयीन प्रशासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी अर्ज करताना धारण केलेले पद वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ किंवा वर्ग-४ याचा उल्लेख करावा.
- अर्जासोबत आपल्या म्हणण्या पुष्ट्यर्थ स्वसाक्षांकित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**रमेश बियाणी**
सचिव

**लक्ष्मीरमण लाहोटी**
अध्यक्ष



Scanned with CamScanner